ePaper

# चेचेन आर्मी अमेरिकी सैन्याच्या विरोधात इराणच्या मदतीला उतरण्यास तयार



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™



पान 2 वरुन...

पाषाणमध्ये हायटेक 'पासपोर्ट सेवा केंद्र'

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 1 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## डीजीसीएची उन्हाळी उड्डांणांमध्ये १२ टक्के कपात; प्रवाशांना फटका

# यंदा उन्हाळ्यात विमान प्रवास आणखी महागणार!

**महाईन्यूज । मुंबई**

**इंधन दरवाढ, भू-राजकीय तणाव आणि विमान कंपन्यांच्या मर्यादित क्षमतेमुळे नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) २०२६च्या उन्हाळी हंगामासाठी देशांतर्गत उड्डाणांमध्ये १२ टक्यांनी कपात केली आहे. यामुळे आठवड्याला सुमारे तीन हजार उड्डाणे कमी होणार असल्याने विमानाचे तिकिट दर वाढण्याची आणि काही मार्गांवर विमान उड्डाणे मर्यादित होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे यंदा उन्हाळ्यातील विमान प्रवास आणखी महागणार आहे.**




डीजीसीएने नऊ विमान कंपन्यांसाठी २९ मार्च ते २४ ऑक्टोबर २०२६ या उन्हाळी हंगामाचे देशांतर्गत उड्डाणांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. भारतीय विमान कंपन्या २९ मार्चपासून सुरू झालेल्या उन्हाळी हंगामात दर आठवड्याला २२ हजार ६०० ते २३ हजार ०५० देशांतर्गत उड्डाणे चालविणार आहेत. गेल्या वर्षी, उन्हाळी हंगामात दर आठवड्याला २५ हजार ६१० उड्डाणे झाली होती.

डीजीसीएने आपल्या वेबसाइटवर २०२६ साठी विमान कंपनीनिहाय देशांतर्गत उन्हाळी वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. या वर्षीच्या उन्हाळी वेळापत्रकात उड्डाणे चालविणाऱ्या नऊ विमान कंपन्यांमध्ये एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेस, इंडिगो, अकासा एअर, स्पाईस जेट, अलायन्स एअर, फ्लाय ९१, स्टार एअर आणि इंडिया वन एअर यांचा समावेश आहे. फेब्रुवारीच्या अखेरीपासून पश्चिम आशियातील भू-राजकीय तणावामुळे भारतातून दुबई, अबू धाबी, बँकॉक आणि सिंगापूरसारख्या ठिकाणांसाठीची विमान सेवा स्थगित झाली आहे. काही विमानतळांवरून आंतरराष्ट्रीय उड्डाणे कमी झाली आहेत.

इंधनाच्या वाढत्या किंमती आणि भू-राजकीय तणाव कायम राहिल्यास, विमान कंपन्या जास्त मागणी असलेल्या आणि फायदेशीर मार्गांना प्राधान्य देऊन आपली क्षमता आणखी कमी करू शकतात. ज्यामुळे लहान शहरांमधील उड्डाणे कमी होण्याची शक्यता आहे. खर्च स्थिर झाल्यास आणि तणाव कमी झाल्यास, आर्थिकदृष्ट्या सक्षम कंपन्या हळूहळू वेळापत्रकात बदल करू शकतात.

### देशांतर्गत पर्यटनाला फटका

इराण-इस्त्रायल,अमेरिका युद्धामुळे जागतिक हवाई वाहतूक विस्कळीत असल्याने यंदा नागरिकांनी आंतरराष्ट्रीय मार्गापेक्षा देशांतर्गत सहलींला पसंती दिली आहे. मात्र आता विमान संख्येत कपात झाल्याने देशांतर्गत विमान प्रवास महागण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे देशांतर्गत सहलींसाठी प्रवाशांना जादा पैसे मोजावे लागणार आहेत.

# पाषाणमध्ये हायटेक 'पासपोर्ट सेवा केंद्र'

## बेकायदा पासपोर्ट प्रकरणांवर कारवाई सुरू; एआयद्वारे बनावट कागदपत्रांचा पर्दाफाश

**महाईन्यूज । पुणे**

**जागा अपुरी पडत असल्याने मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राचे (पीएसके) पाषाण येथे स्थलांतर करण्यात आले. वाढती गर्दी आणि अत्याधुनिक सुविधांमुळे हा निर्णय घेतल्याचे क्षेत्रीय पारपत्र अधिकारी डॉ. विनोद गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**




दरम्यान, ३० मार्चनंतर मुंढवा केंद्राची 'अपॉइंटमेंट' घेतलेल्या नागरिकांनी पाषाण येथील नवीन केंद्रात त्याच तारखेला आणि दिलेल्या वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले.

बाणेर-पाषाण लिंक रस्त्यावरील 'मॉटक्लेयर बिल्डिंग' या नवीन वास्तूत या केंद्राचे कामकाज सोमवारपासून सुरू झाले. या पार्श्वभूमीवर गायकवाड यांनी पत्रकारांशी संवाद साधला. बाणेर, पाषाण, औंध, बावधन आणि हिंजवडी आयटी पार्क परिसरातील नागरिकांसाठी हे नवीन केंद्र अधिक सोयीचे ठरणार असून, नव्या कार्यालयात आधुनिक सुविधा असल्याचे गायकवाड यांनी नमूद केले.

ते म्हणाले, 'पुण्याच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण होत आहे. ग्लोबल कपॅसिटी सेंटर आणि काही महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय कंपन्या पुण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पारपत्राची सुविधा जलद आणि सोयीसुविधांनी युक्त असणे गरजेचे आहेत. पारपत्रासाठी अर्ज करणाऱ्यांची संख्या गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने वाढत आहे. वाढत्या गर्दीमुळे मुंढव्यातील पारपत्र सेवा केंद्राची जागा अपुरी पडत होती. हिंजवडी आणि परिसरातील आयटी कंपन्यांच्या दृष्टीने अंतराचाही प्रश्न होता. त्यामुळे या केंद्राचे स्थलांतर करण्यात आले. आता नव्या पारपत्र सेवा केंद्रात सुसज्ज जागा आणि अधिक सोयीसुविधा आहेत.'

'पारपत्रासाठीचे अर्ज नाकारता येत नाहीत. पडताळणी केल्यानंतर निकषांनुसार प्रत्येकाला पारपत्र द्यायचे असते. त्यासाठीची अर्जप्रक्रिया जलद करण्याच्या दृष्टिने अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. काही प्रमाणात अर्जांची छाननी करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवण्यात आली आहे. फेब्रुवारीच्या एका महिन्यात ४० हजारांहून अधिक सुमारे ९० टक्के अर्जदारांना पारपत्र देण्यात आले, तर कागदपत्रांच्या अभावामुळे आणि पडताळणीत आढळलेल्या त्रुटींमुळे काही अर्ज नाकारण्यात आले,' असेही त्यांनी नमूद केले.

### 18 हजार चौरस फूट जागेत स्थलांतर

मुंढवा येथील पासपोर्ट सेवा केंद्र सोमवारी (30 मार्च) बाणेर-पाषाण लिंक रोडवर स्थलांतरित झाले. नवीन कार्यालय 18 हजार चौरस फूट जागेत आहे. प्रतीक्षा कक्ष मोठा असून, त्यात स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष आणि दोन मोठे हॉल आहेत. येथे दररोज 1800 पेक्षा जास्त पासपोर्ट अपॉइंटमेंट्स दिल्या जातील. लोकांना पासपोर्टसंबंधी अधिकृत माहिती मिळावी यासाठी 'ओपन हाऊस'चे आयोजनही केले जात आहे.

# लोणावळ्यात १५ जणांनी मिळून रिसॉर्ट कर्मचाऱ्यांना केली मारहाण; एक गंभीर जखमी

**महाईन्यूज । पुणे**

**हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेल्यानंतर एखादा पदार्थ संपले असेल तर आपण मारहाण करतो का? पण लोणावळ्यात असा प्रकार घडला आहे. मुंबईपासून ८४ किमीवर असलेल्या वाकसई येथील झेस्टिन हिल रिसॉर्ट येथे १५ जण गेले होते. २६ मार्च रोजी जेवणाला मटण ऑर्डर करण्यावरून झालेला वाद पुढे मारहाणीपर्यंत पोहोचला आणि त्यानंतर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**




लोणावळा ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणी आता हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. १५ पैकी पाच आरोपींची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे. मुलुंडमधील वैभव वैती, ठाण्यातील स्मित वेनी आणि राज नाईक, भावेश वाईंगणकर आणि ललित वैती यांची ओळख पटलेली आहे. तर इतरांचा शोध सुरू आहे.

लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात रिसॉर्टच्या चालक साधना मोहन भोईर यांनी गुन्हा दाखल केला आहे. भोईर यांनी सांगितले की, मुंबईहून १५ जणांचा ग्रुप रिसॉर्टमध्ये आला होता. २६ मार्चच्या दुपारी ग्रुपने जेवणासाठी मटणाची ऑर्डर दिली. मात्र रिसॉर्टच्या कर्मचाऱ्यांनी मटण संपल्याचे सांगताच ग्रुपमधील काही जणांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली.

ग्रुपमधील एका व्यक्तीने साधना भोईर यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्यांचे डोके प्लास्टिक खुर्चीवर आपटले. त्यानंतर त्यांनी जेवण बनविणारा आचारी महेश आणि मदतनीस संदीप आणि नितीन यांना मारहाण केली. एवढेच नाही तर या टोळक्याने सौरभ गोरे नावाच्या आणखी एका कर्मचाऱ्यालाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

यापैकी गोरे यांच्या पोटावर आणि कमरेवर मार लागल्यामुळे त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. गोरे यांच्या मूत्राशयाला जबर दुखापत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्यावर सध्या आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत, अशी माहिती लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी दिली. पोलिसांनी हत्येचा प्रयत्न केल्याबद्दल भारतीय न्याय संहितेच्या कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.




# मोबाइल संच खरेदीवर सूट देण्याच्या आमिषाने ४६ लाखांची फसवणूक

**महाईन्यूज । पाटस**

महागड्या मोबाइल संच खरेदीवर दहा हजार रुपयांची सूट देण्याच्या आमिषाने एका तरुणाची सायबर चोरट्यांनी तब्बल ४६ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका तरुणाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसा, तक्रादार ३५ वर्षीय तरुण कात्रज भागात राहायला आहे. सायबर चोरट्यांनी तरुणाच्या मोबाइलवर संपर्क साधला. 'सध्या बाजारातील महागड्या मोबाइल संच खरेदीवर दहा हजार रुपयांची सूट देतो', असे आमिष चोरट्यांनी तरुणाला दाखविले होते. त्यानंतर मोबाइल खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी करावी लागेल, असे चोरट्यांनी तरुणाला सांगितले. तरुणाला आमिष दाखवून चोरट्यांनी जाळ्यात ओढले. त्यानंतर तरुणाने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी ४६ लाख ७५ हजार रुपये जमा केले. पैसे जमा केल्यानंतर चोरट्यांनी त्यांचे मोबाइल क्रमांक बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुलकुमार खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

# भाजपचा मंडल प्रशिक्षण वर्ग उत्साहात

## संघटनात्मक उपक्रम : पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी राबविण्यात येत असलेल्या 'पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६' अंतर्गत कासारवाडी येथील हॉटेल कलासागरमध्ये विशेष मंडल प्रशिक्षण वर्ग उत्साहात पार पडला. दिघी-गवळीनगर-गव्हाणेवस्ती आणि धावडेवस्ती-इंद्रायणीनगर-नेहरूनगर या दोन महत्त्वाच्या मंडळांतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.**




> मंडल प्रशिक्षण वर्गातून कार्यकर्त्यांना केवळ संघटनात्मक दिशा नाही, तर विचारांची स्पष्टता आणि काम करण्याची नवी ऊर्जा मिळाली आहे. बूथ स्तरापासून नागरिकांपर्यंत पक्षाच्या योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध असून, येणाऱ्या काळात अधिक सक्षम आणि समन्वयित पद्धतीने जनसेवा घडताना दिसेल.
>
> - संजय पटनी, वरिष्ठ उपाध्यक्ष, भाजपा.

या प्रशिक्षण वर्गात शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख तसेच सक्रिय कार्यकर्ते एकत्र आल्याने विचारांची देवाणघेवाण होऊन संघटनात्मक समन्वय अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. एकाच ठिकाणी दोन मंडळांचे प्रशिक्षण झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे यांनी सांगितले की, "पक्षाची विचारप्रणाली आणि केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हेच कार्यकर्त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. या प्रशिक्षणातून मिळणारे ज्ञान कार्यकर्त्यांना जनसेवेत अधिक सक्षम करेल."

प्रशिक्षणादरम्यान संघटन बांधणी, अंत्योदयाचा विचार आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बूथ स्तरावर पक्षाची उपस्थिती वाढविणे, शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सरकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे यावर विशेष भर देण्यात आला.

या कार्यक्रमाला आमदार महेशदादा लांडगे, आमदार अमितजी गोरखे, माजी खासदार अमरजी साबळे, हेमंतजी हरहरे, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, वैशाली खाड्ये, मधुकर बच्चे, महापौर रवी लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, राजेशअण्णा पिल्ले, माजी सरचिटणीस राजू दुर्गे, मंडल अध्यक्ष प्रमोद परदेशी, शिवराज लांडगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गामुळे आगामी काळात पक्षाची संघटनात्मक पकड अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



# महापालिका अभय योजनेला मुदतवाढ द्या : नगरसेवक कुंदन गायकवाड

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील थकीत मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळावा या उद्देशाने "अभय योजना"ला मुदतवाढ देण्याची ठाम मागणी नगरसेवक कुंदन अंबादास गायकवाड यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. त्यांच्या या पुढाकारामुळे शहरातील हजारो मालमत्ताधारकांना दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**




> अभय योजनेची मुदतवाढ मिळाल्यास शहरातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत या सवलतीचा लाभ पोहोचवण्यासाठी आम्ही स्वतः पुढाकार घेऊ. थकीत कराचा प्रश्न सोडवून नागरिकांना दिलासा देणे आणि महापालिकेच्या महसुलात भर घालणे, हेच आमचे प्राधान्य राहील.
>
> - कुंदन गायकवाड, नगरसेवक, भाजपा.

याबाबत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले की, १ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या "अभय योजना"मुळे करदात्यांना दंडावर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात आली होती. या योजनेचा उद्देश थकीत कर वसुली वाढवणे आणि नागरिकांना आर्थिक दिलासा देणे हा होता.

गायकवाड यांच्या मते, ही योजना अल्प कालावधीसाठी राबविण्यात आल्यामुळे आणि तिचा पुरेसा प्रसार न झाल्यामुळे अनेक नागरिक या लाभापासून वंचित राहिले. "शहरात अजूनही मोठ्या प्रमाणात थकीत कर बाकी आहे. अनेक नागरिकांना या योजनेची माहिती उशिरा मिळाली. त्यामुळे त्यांना सवलतीचा लाभ घेता आला नाही," असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे, किमान एक महिना तरी या योजनेची मुदतवाढ देण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे. त्यांच्या या प्रस्तावामुळे महापालिकेच्या महसुलात वाढ होण्यासोबतच नागरिकांनाही मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

स्थानिक पातळीवर गायकवाड यांच्या या मागणीचे स्वागत होत असून, "ही मुदतवाढ मिळाल्यास अनेक करदाते पुढे येऊन थकीत रक्कम भरण्यास तयार होतील," अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



## भूमिका

# लंका जळू नये म्हणून



**मध्यपूर्वेत गेल्या काही दिवसांपासून वाढलेला अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा केवळ प्रादेशिक तणाव नसून जागतिक स्थैर्याला मोठे आव्हान ठरत आहे. 28 फेब्रुवारी 2026 रोजी झालेल्या संयुक्त हल्ल्यानंतर इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचा निर्णय घेतला आणि टँकरवर हल्ले सुरू केले.**

या घटनांमुळे जगातील ऊर्जा पुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. याच पार्श्वभूमीवर अर्थतज्ज्ञ जेफ्री सॅक्स यांनी संयुक्त अरब अमिरातीला दिलेला इशारा अत्यंत महत्त्वाचा मानावा लागेल. “जर यूएई युद्धात उतरले तर दुबई आणि अबूधाबी उद्ध्वस्त होऊ शकतात,” असा त्यांचा स्पष्ट इशारा आहे.

दुबई आणि अबूधाबी ही शहरे केवळ मध्यपूर्वेतील नव्हे तर जगातील प्रमुख आर्थिक आणि पर्यटन केंद्रे म्हणून ओळखली जातात. गेल्या दोन दशकांत यूएईने तेलावर अवलंबून न राहता पर्यटन, व्यापार आणि वित्तीय सेवांवर आधारित आधुनिक अर्थव्यवस्था उभी केली आहे. लाखो पर्यटक आणि गुंतवणूकदार या शहरांकडे आकर्षित होतात. अशा परिस्थितीत युद्धाची छाया या शहरांवर पडली, तर त्याचा परिणाम केवळ स्थानिक अर्थव्यवस्थेपुरता मर्यादित राहणार नाही, तर जागतिक व्यापार, विमान वाहतूक, पर्यटन आणि गुंतवणुकीवरही मोठा फटका बसेल. इतिहास सांगतो की शांततेच्या काळात निर्माण झालेली समृद्धी युद्धाच्या एका ठिणगीने राख होऊ शकते.

या संघर्षाचा सर्वात मोठा परिणाम ऊर्जा क्षेत्रावर दिसून येत आहे. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सुमारे 20 टक्के तेल आणि गॅस पुरवठ्याची मुख्य वाहिनी मानली जाते. ती बंद झाल्यामुळे ब्रेंट क्रूडचे दर झपाट्याने वाढले आणि अनेक देशांमध्ये इंधन महागले. परिणामी महागाई वाढली, उद्योगांचे खर्च वाढले आणि जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानावर संकट निर्माण झाले आहे. भारतासारख्या विकसनशील देशांनाही या परिस्थितीचा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा संघर्ष केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित नसून संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय ठरला आहे.

जगाच्या इतिहासाकडे पाहिले तर युद्धाने कधीही दीर्घकालीन समाधान दिलेले नाही. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात लाखो लोकांनी जीव गमावला आणि अनेक देशांची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघासारख्या संस्थांची स्थापना करून शांततेचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न झाला. तरीही व्हिएतनाम, इराक, अफगाणिस्तान आणि युक्रेनसारख्या युद्धांनी पुन्हा पुन्हा दाखवून दिले की संघर्ष हा समस्येचा कायमस्वरूपी उपाय नसतो. युद्धामुळे शरणार्थी, आर्थिक मंदी आणि सामाजिक अस्थिरता निर्माण होते.

आजच्या परिस्थितीत सर्व देशांनी संयम आणि कूटनीतीचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. जागतिक शक्तींनी आपापल्या राजकीय स्वार्थासाठी युद्धाचा मार्ग निवडण्याऐवजी संवाद आणि सहकार्याचा मार्ग निवडला पाहिजे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या प्रगत शहरांनी युद्धात सहभागी होण्यापूर्वी त्याचे दीर्घकालीन परिणाम लक्षात घेतले पाहिजेत. समृद्धी टिकवायची असेल तर शांतता टिकवणे गरजेचे आहे.

एकूणच, “लंका जळू नये” यासाठी जगातील सर्व देशांनी सजग राहणे ही काळाची गरज आहे. युद्धाची आग पेटवणे सोपे असते, पण ती विझवणे अत्यंत कठीण असते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायाने तणाव कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. शांतता, संवाद आणि सहकार्य हाच खऱ्या विकासाचा मार्ग आहे; कारण युद्धात कोणताही खरा विजेता नसतो.

## प्रासंगिक »

### चांगला राजा

**एकदा एका तळ्यातला बेडकांना वाटले, की आपल्याला एक राजा हवा. म्हणून त्यांनी देवाकडे तशी मागणी केली.**

तेव्हा देवाला हसूच आले व त्याने 'हा घ्या राजा !' म्हणून एक लाकडी ओंडका तळ्यात टाकला. तो पाण्यावर पडताच पाणी उसळले. ते पाहून सगळे बेडूक घाबरले आणि बाजूला जाऊन बसले. थोड्या वेळाने पाणी शांत झाल्यावर तो ओंडका काही हालचाल करीत नाही असे पाहून त्याच्यावर चढले व उड्या मारू लागले. मग त्यांना वाटले की या राजापेक्षा दुसरा चांगला राजा हवा. तेव्हा त्यांनी देवाची प्रार्थना करून दुसरा चांगला राजा पाठवण्याची विनंती केली. देवाने एक बगळा पाठविला. त्याने बेडकांना मारून खायला सुरुवात केली. म्हणून बेडकांनी देवाकडे अजून चांगल्या राजाची मागणी केली. ते ऐकून देव म्हणाला, 'मी तुम्हांला पहिला राजा पाठवला होता तो तुम्हांला आवडला नाही. आता तुमचं कर्म तुम्हीच भोगा.'

- तात्पर्य:

देवाने ज्या स्थितीत ठेवले आहे त्यात समाधानी असावे.

मध्यपूर्वेतील वाढत्या युद्धपरिस्थितीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला असून, भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांसमोर गंभीर आव्हान उभे ठाकले आहे.

# ऊर्जा संकटाचा मुकाबला

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परिस्थिती चिंताजनक असल्याचे स्पष्ट करत देशाने सज्ज, सतर्क आणि एकजूट राहण्याचे आवाहन केले आहे. ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी सरकार आणि नागरिकांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे. अफवांच्या आधारे निर्माण होणारा गोंधळ हा संकट अधिक तीव्र करण्याचे काम करतो. अलीकडे लॉकडाऊन लागू होणार असल्याच्या अफवांमुळे देशभर पेट्रोल, डिझेल आणि गॅससाठी मोठ्या रांगा लागल्या. अशा घटनांमुळे पुरवठा साखळीवर अनावश्यक ताण येतो आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे सरकारच्या माहिती यंत्रणेने वेळेवर आणि अचूक माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे. संकटाच्या काळात पारदर्शक संवाद हा लोकांचा विश्वास टिकवून ठेवण्याचा महत्त्वाचा आधार ठरतो.



ऊर्जा संकटाचा सर्वात मोठा धडा म्हणजे परदेशी इंधनावरील अवलंबित्व कमी करणे. गेल्या काही वर्षांत भारताने ऊर्जा स्वावलंबनाचे लक्ष्य ठेवले असले, तरी प्रत्यक्षात खनिजतेल आयातीचे प्रमाण वाढले आहे. दरवर्षी इंधन खरेदीसाठी मोठ्या प्रमाणावर परकीय चलन खर्च करावे लागते. जर देशांतर्गत तेल व गॅस उत्पादन वाढवले आणि सौर, जैव इंधन तसेच इतर पर्यायी ऊर्जेच्या स्रोतांचा वापर वाढवला, तर भविष्यात अशा जागतिक संकटांचा परिणाम कमी करता येईल.

सध्याच्या परिस्थितीत सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादनशुल्क कमी करून इंधनदर नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे ग्राहकांवरील तात्काळ आर्थिक भार काही प्रमाणात कमी झाला आहे. मात्र, दीर्घकालीन उपाय म्हणून ऊर्जा वापरात काटकसर आणि कार्यक्षम व्यवस्थापन आवश्यक आहे. औद्योगिक उत्पादन, वाहतूक आणि शेती यांसारख्या क्षेत्रांमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

एकूणच, ऊर्जा संकट हे केवळ सरकारचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे आव्हान आहे. सरकारने योग्य धोरणे राबवणे आणि नागरिकांनी जबाबदारीने ऊर्जा वापरणे, या दोन्ही गोष्टी समान महत्त्वाच्या आहेत. पर्यायी ऊर्जेचा प्रसार, देशांतर्गत उत्पादन वाढ आणि जनजागृती यांद्वारेच या संकटावर प्रभावीपणे मात करता येईल. संकटाच्या या काळात संयम, सहकार्य आणि दूरदृष्टी या तीन गोष्टीच भारताला ऊर्जा सुरक्षिततेच्या दिशेने पुढे नेऊ शकतात.

## ।। अभंगवाणी ।।



ब्रह्मा एक परिपूर्ण ।
तेथें नाहीं दोष गुण ॥१॥

पराचा देखती जे दोष ।
तेचि दोषी महादोषी ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ९ एकर जमिनीचा 'हिबानामा' घोटाळा; खासदार भुमरे यांच्या चालकावर गुन्हा...

## कोट्यवधींची फसवणूक, विश्वासघात व धमकीचे आरोप

**महाईन्यूज । छत्रपती संभाजीनगर**




**शहरातील दाऊदपुरा भागातील नऊ एकर जमिनीच्या व्यवहारातून शिवसेना खासदार संदिपान भुमरे यांचे वाहन चालक जावेद रसूल शेख यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आर्थिक फसवणूक, विश्वासघात आणि धमकी दिल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला असून, या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.**

दाऊदपुरा परिसरातील नऊ एकर 'हिबानामा' जमिनीच्या व्यवहारावरून हा सर्व वाद सुरू झाला. मुजाहिद इकबाल खान यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, या जमिनीच्या व्यवहारात त्यांचा विश्वासघात करून मोठी आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणात जमिनीचे मूळ मालक मीर मेहमूद अली आणि खासदार भुमरे यांचे चालक जावेद रसूल शेख या दोघांनाही आरोपी करण्यात आले आहे.

मुजाहिद खान यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी या प्रकरणात गांभीर्याने दखल घेतली आहे. आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. जमिनीच्या व्यवहारात फसवणूक करणे. कायदेशीर प्रक्रियेत खोटी माहिती देऊन फसवणे.फिर्यादीला धमकावून दबाव तंत्राचा वापर करणे, या कलमाद्वारे गुन्हे दाखल केले आहेत.

### गुन्हे शाखेकडून तपास सुरू

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून या प्रकरणाची चौकशी आता गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आला आहे. खासदार संदिपान भुमरे यांच्या निकटवर्तीयावर हा गुन्हा दाखल झाल्याने राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत. पोलीस आता या व्यवहारातील आर्थिक धागेदोरे तपासत असून, लवकरच काही मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.



# खरात प्रकरणात नवा धक्का; गर्भधारणा गूढाचा तपास

**महाईन्यूज । नाशिक**

नाशिकमधील भोंदू ज्योतिषी अशोक खरात याच्या लैंगिक शोषण प्रकरणात दररोज नवे धक्कादायक तपशील समोर येत आहेत. अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या खरातची विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) सध्या कसून चौकशी सुरू असून, पोलिसांकडून त्याच्याविरोधात सबळ पुरावे गोळा केले जात आहेत.

तपासादरम्यान एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. खरातकडून लैंगिक शोषण झालेल्या महिलांपैकी एकही महिला गर्भवती राहिलेली नसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे शोषणानंतर महिलांना गर्भधारणा होऊ नये यासाठी तो नेमका कोणता उपाय करत होता, याचा शोध पोलिस घेत आहेत.

पीडित महिलांच्या माहितीनुसार, विविध समस्या घेऊन आलेल्या महिलांना खरात तांत्रिक विधी व 'योनी शुद्धिकरण'च्या नावाखाली फसवत असे. या वेळी तो विशिष्ट चवीचे पाणी आणि पेढा 'प्रसाद' म्हणून देत असे. हा प्रसाद घेतल्यानंतर गुंगी येत असे आणि काय घडत आहे याची शुद्ध राहत नसल्याचे महिलांनी सांगितले आहे.

तपास यंत्रणेला संशय आहे की, महिलांना गर्भधारणा होऊ नये यासाठी खरात काही विशिष्ट गर्भनिरोधक औषधांचा वापर करत असावा. तसेच शोषणापूर्वी महिलांना बेशुद्ध किंवा संमोहित करण्यासाठी काही औषधांचा वापर केला जात होता का, याचाही तपास सुरू आहे. यासंदर्भात नाशिकमधील काही डॉक्टरांचीही चौकशी केली जाण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

या प्रकरणामुळे नाशिकसह राज्यभरात खळबळ उडाली असून, तपासात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# तुकाराम मुंढे यांची पुन्हा बदली; राज्य प्रशासनात मोठे फेरबदल

**महाईन्यूज । मुंबई**

**दिव्यांग कल्याण विभागाचा कायापालट करतानाच बोगस संस्थांची दुकानदारी बंद करणारे दिव्यांग कल्याण विभागाचे धडाडीचे सचिव तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली असून त्यांच्याकडे आता आपत्ती व्यवस्थापन विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिवपदी लोकेश चंद्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**



राज्य विधिमंडळाचे अधिवेशन संपताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी राज्य प्रशासनात मोठे फेरबदल केले असून मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिव अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिका आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर त्यांच्या जागी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांची बदली करण्यात आली आहे.

विकास चंद्र रस्तोगी यांची वित्त विभागात अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), श्रीमती विनिता वैद सिंघल प्रधान सचिव यांची मृद व जलसंधारण विभागात बदली करण्यात आली आहे.

परिमल सिंग यांची सचिव (कृषी) म्हणून तर तुकाराम मुंढे यांची सचिव, आपत्ती व्यवस्थापन येथे नियुक्ती करण्यात आले आहे. लहू माळी यांची व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वासन प्रकल्प लिमिटेड,माणिक गुरसाल यांची सचिव, दिव्यांग कल्याण विभागात तर श्रीमती प्रेरणा देशभ्रतार सह आयुक्त, राज्य कर, मुंबई यांची आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच पृथ्वीराज बी. पी. अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांची महापालिका आयुक्त, वसई विरार महानगरपालिका म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### बदलांची झटपट माहिती

राज्य प्रशासनात मोठे फेरबदल करत तुकाराम मुंढे यांची आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली असून लोकेश चंद्रा यांची मुख्यमंत्र्यांच्या अप्पर मुख्य सचिवपदी बदली करण्यात आली आहे. अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिका आयुक्त म्हणून नियुक्ती झाली आहे. तसेच विकास चंद्र रस्तोगी (वित्त), विनिता वैद सिंघल (मृद व जलसंधारण), परिमल सिंग (कृषी), लहू माळी (शिवशाही पुनर्वसन प्रकल्प), माणिक गुरसाल (दिव्यांग कल्याण), प्रेरणा देशभ्रतार (मत्स्यव्यवसाय) आणि पृथ्वीराज बी. पी. (वसई-विरार महापालिका आयुक्त) अशा अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदली-नियुक्त्यांमुळे प्रशासनात व्यापक हालचाल झाली आहे.

# मंत्रिपदासाठी २७ आमदारांची तंत्र-साधना? बिहार राजकारणात खळबळ

## नितीश कुमार यांच्या राजीनाम्यानंतर बिहारमध्ये राजकीय हालचाली वेगात; नवरात्रीत तंत्रसाधना

महाईन्यूज । पटना

**नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्याने बिहारमध्ये नवीन सरकार येणार आहे. या नव्या सरकारमध्ये मंत्री बनण्यासाठी आमदारांनी तंत्र मंत्राचा आधार घेतला आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री स्पर्धेत सहभागी २७ आमदार तांत्रिकाच्या संपर्कात आहेत. कुणी घरातील ग्रह दोष दूर करण्यासाठी पूजा केली तर काहींनी तांत्रिकाकडून नव्या सरकारमध्ये मंत्रिपद मिळावे म्हणून पूजा केली आहे.**



त्यात सध्याच्या सरकारमध्ये मोठी जबाबदारी निभावणाऱ्या नेत्यांचाही समावेश आहे. उपमुख्यमंत्र्यापासून १२ हून अधिक मंत्र्यांच्या घरी नवरात्रीत ९ दिवसापर्यंत तंत्र साधना करण्यात आली.

बिहारच्या राजकारणात तंत्र मंत्राचं मोठं कनेक्शन आहे. बिहारच्या तंत्र साधक आणि ज्योतिषांचे दिल्लीतील नेत्यांशीही कनेक्शन आहेत. बिहारमधील बहुतांश नेत्यांसाठी उपासना, विधी आणि धार्मिक श्रद्धा हे त्यांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनाचा एक भाग आहेत. बिहारमधील प्रसिद्ध ज्योतिषी डॉ. श्रीपती त्रिपाठी यांचे अनेक राजकीय शिष्य आहेत. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांपासून ते बिहारमधील प्रत्येक प्रमुख आणि प्रभावशाली नेत्यापर्यंत पंडित श्रीपती त्रिपाठी त्यांच्या संपर्कात आहेत.

त्या म्हणाल्या की, बिहारमध्ये नवीन सरकारबाबत पुन्हा एकदा समीकरणे जुळत असल्याने अनेक शिष्य माझ्याकडे आले आहेत. ते नवीन सरकारमध्ये चांगल्या पदांसाठी उपाय शोधत आहेत. मी त्यांच्या कुंडलीचा अभ्यास केला आहे आणि ग्रहस्थिती अनुकूल करण्यासाठी उपाययोजना विकसित केल्या आहेत, जेणेकरून ते सरकारमध्ये मोठी जबाबदारी स्वीकारू शकतील. त्यांना राजकारणात अधिक यश आणि स्थान मिळावे यासाठी काही पूजा विधी देखील केले जातात. नवरात्रीदरम्यान मातृदेवीला प्रसन्न करण्यासाठी दृढनिश्चयाने पूजाही केली जाते असं त्यांनी सांगितले. दैनिक भास्करने केलेल्या स्टिंगमध्ये हा खुलासा समोर आला.

नेपाळ सीमेवरील रक्सौल येथील काली न्यास मंदिरात १६ हून अधिक राजकारण्यांच्या पूजाविधींविषयी माहिती मिळाली आहे. येथील तांत्रिक साधक जगद्गुरू वामाचार्य सेवक संजय नाथ आहेत, जे त्यांच्या तंत्र साधनेसाठी भारत आणि परदेशातही प्रसिद्ध आहेत. ते नेपाळी राजकारणातील अनेक प्रभावशाली नेत्यांसाठी पूजाविधीही करतात. ते काली मंदिर न्यास आणि दहा महाविद्यांच्या साधनेसाठी प्रसिद्ध आहेत. संजय नाथ यांनीही बिहारच्या राजकारणात सत्तेतील आणि विरोधकही छोट्या मोठ्या कामासाठी माझ्याशी संपर्क साधतात असं त्यांनी सांगितले.

दरम्यान, तंत्र मंत्राच्या माध्यमातून काही आमदार, नेत्यांना कोलकाता येथेही पूजा केल्या आहेत. एका रिपोर्टरने आमदाराचा माणूस म्हणून जेव्हा पंडित विजय महाराज यांच्याशी संपर्क साधला. तेव्हा बिहार, झारखंडच्या राजकारणातील अनेक नेते माझे शिष्य असल्याचे त्यांनी सांगितले. संमोहनाच्या तांत्रिक प्रक्रियेद्वारे तो कोणालाही नियंत्रित करू शकतो आणि त्यांच्याकडून महान कार्ये करून घेऊ शकतो असं या तांत्रिकाचा दावा आहे. काही आमदारांनी कामाख्या देवीची साधना केली असल्याचे समोर आले आहे.

### स्टिंगमधील धक्कादायक बाबी...


नव्या सरकारमध्ये मंत्रिपद मिळवण्यासाठी बिहारमधील तब्बल २७ आमदारांनी तांत्रिकांच्या सल्ल्याने पूजा व तंत्रसाधना केल्याचा दावा स्टिंग ऑपरेशनमधून समोर आला आहे. नवरात्रीदरम्यान काही मंत्र्यांच्या घरी विशेष विधी पार पडले, तर रक्सौल आणि कोलकाता येथेही पूजाविधी करण्यात आल्याची माहिती उघड झाली असून, राजकारणात तंत्र-मंत्राचा प्रभाव पुन्हा चर्चेत आला आहे.

# इराणच्या भूमीवर उतरणाऱ्या आक्रमकांचे पाय कापू; सैन्याचा इशारा

महाईन्यूज । वॉशिंग्टन

**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव दिवसेंदिवस तीव्र होत असून युद्धसदृश परिस्थिती निर्माण होताना दिसत आहे. अमेरिकेकडून जमिनीवरून हल्ल्याची शक्यता व्यक्त होत असताना इराणने शेजारील आखाती देशांमधील अमेरिकन लष्करी तळांना लक्ष्य करण्यास सुरुवात केल्याचे वृत्त आहे.**





इराणच्या लष्कराने आक्रमकांना कठोर इशारा दिला आहे. खातम अल-अन्बिया मुख्यालयाचे प्रवक्ते इब्राहिम झोल्फाघरी यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, इराणवर हल्ला करणाऱ्यांचे "पाय कापून टाकले जातील" आणि देश कोणत्याही परिस्थितीत प्रत्युत्तर देण्यास सज्ज आहे.

दरम्यान, या संघर्षात रशियाच्या चेचेन तुकड्यांची संभाव्य भूमिका असल्याची चर्चा रंगली असून त्यामुळे हा संघर्ष अधिक व्यापक होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे अमेरिका सार्वजनिक स्तरावर राजनैतिक भूमिका घेत असली तरी प्रत्यक्षात लष्करी हालचाली सुरू असल्याचा आरोप इराणकडून केला जात आहे.

या तणावाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझची सामुद्रधुनी हा केंद्रबिंदू ठरत आहे. जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा सागरी मार्ग इराणने नियंत्रित केल्याने ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होत आहे. इराणच्या संसदेत या मार्गावरील नियंत्रण आणखी मजबूत करण्याच्या हालचाली सुरू आहेत.


दरम्यान, 'वॉल स्ट्रीट जर्नल'च्या वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या भूमिकेत काहीसा बदल दर्शवला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद राहिली तरी इराणविरोधातील लष्करी कारवाई थांबवण्याची तयारी त्यांनी दर्शवली असून, हा मार्ग पुन्हा खुला करण्यासाठी आखाती देश व नाटोच्या मदतीचा पर्यायही विचाराधीन आहे.

सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्यासाठी लष्करी पर्यायांचा अभ्यास सुरू असला तरी सध्या तो अमेरिकेच्या प्राधान्यक्रमात नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, या वाढत्या तणावामुळे संपूर्ण पश्चिम आशियात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे.




# श्रीलीलाचा रोमँटिक अंदाज व्हायरल

बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन आणि दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला लवकरच एका रोमँटिक चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येणार आहेत. सध्या या चित्रपटाचे चित्रीकरण काश्मीरमध्ये सुरू असून, सेटवरील काही फोटो सोशल मीडियावर लीक झाले आहेत. व्हायरल झालेल्या फोटोंमध्ये दोघे शेतात बसलेले दिसतात. या चित्रपटासाठी कार्तिकने दाट दाढी आणि लांब केसांचा नवा लूक घेतलेला दिसतो. चित्रपटाचे दिग्दर्शक अनुराग बसू हे आहेत. हा चित्रपट यापूर्वी अनेकदा पुढे ढकलण्यात आला होता. मात्र, आता चित्रीकरण सुरळीत सुरू झाल्याचे संकेत मिळत आहेत. या चित्रपटात कार्तिक आणि श्रीलीला पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. चित्रपटाचे नाव आणि प्रदर्शित होण्याची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही.





# रीतला टीका पडली महागात

आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर २' बॉक्स ऑफिसवर हिट ठरला असला तरी त्यावर टीका होत आहे. 'सैयारा' फेम अनीत पड्डाची बहीण रीत पड्डा हिने या चित्रपटाला 'प्रोपेगंडा' म्हटल्याने सोशल मीडियावर गदारोळ निर्माण झाला. काही दिवसांपूर्वी रीताने एका युजरला उत्तर देताना 'धुरंधर २' सरकारसमर्थक कथा मांडणारा असून त्यात राजकीय भाषणांचा वापर केल्याचे म्हटले. नोटबंदीसारख्या त्रुटींना योग्य ठरवणे म्हणजे प्रोपेगंडा, असे तिचे मत होते. या विधानांनंतर युजर्सनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली आणि म्हणून सततच्या ट्रोलिंगला कंटाळून तिने तिचे इंस्टाग्राम अकाउंट डिलीट केले.

# ही सर्वात हॉट भूमिका आहे

अभिनेत्री क्रिती सेनन सध्या तिच्या आगामी 'कॉकटेल २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने या चित्रपटातील तिच्या लूकबद्दल खुलासा केला आहे. ती म्हणाली की, या चित्रपटात मी आधीपेक्षा खूप वेगळी दिसत आहे. ही माझ्या करिअरमधील आतापर्यंतची सर्वात हॉट भूमिका आहे. दिग्दर्शक होमी यांची सौंदर्यदृष्टी उत्तम आहे. त्यांनी माझ्यातील एक नवा, कूल पैलू पडद्यावर आणला. तिचा मागील 'तेरे इश्क में' हा चित्रपट खूप भावनिक होता. त्यानंतर तिला हलके-फुलके आणि मजेदार काम करायचे होते. त्यामुळे 'कॉकटेल २'ची ऑफर येताच तिने लगेच होकार दिला, असे ती म्हणाली. हा २०१२ मधील सुपरहिट 'कॉकटेल'चा हा सिक्वेल आहे. यात शाहिद कपूर, क्रिती सेनन आणि रश्मिका मंदाना मुख्य भूमिकेत आहेत. होमी अदजानिया दिग्दर्शित हा चित्रपट १९ जूनला प्रदर्शित होणार असून, तो आधुनिक लव्ह ट्रायंगलवर आधारित आहे.



# वैभव सूर्यवंशीचं वादळ!

## राजस्थान रॉयल्सचा चेन्नईवर दणदणीत विजय

**महाईन्यूज । गुवाहाटी**

**राजस्थान रॉयल्स संघाने आयपीएल २०२६ स्पर्धेत दमदार सुरुवात करत चेन्नई सुपर किंग्ज संघावर ८ गडी राखून शानदार विजय मिळवला. बारसापरा स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात राजस्थानच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवत चेन्नईचा डाव १९.४ षटकांत १२७ धावांवर रोखला.**



१२८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानच्या सलामीवीरांनी आक्रमक सुरुवात केली. वैभव सूर्यवंशीने अवघ्या १५ चेंडूत अर्धशतक झळकावत चेन्नईच्या गोलंदाजांवर तुफान हल्ला चढवला. त्याने १७ चेंडूत ५२ धावांची खेळी करत संघाला भक्कम पाया दिला. त्याला यशस्वी जैस्वाल याने नाबाद ३८ धावांची साथ दिली. शेवटी कर्णधार रियान पराग (नाबाद १४) आणि ध्रुव जुरेल (१८) यांच्या योगदानाने राजस्थानने सहज विजय मिळवला.

यापूर्वी, नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतलेल्या राजस्थानने चेन्नईच्या फलंदाजांना सुरुवातीपासूनच अडचणीत टाकले. संजू सॅमसन आणि ऋतुराज गायकवाड स्वस्तात बाद झाल्यानंतर चेन्नईचा डाव कोलमडला. मधल्या फळीतही फलंदाज अपयशी ठरले. शेवटी जेमी ओव्हरटनच्या ४३ धावांच्या खेळीमुळे चेन्नईला १२७ धावांपर्यंत मजल मारता आली.

राजस्थानच्या गोलंदाजांच्या अचूक माऱ्यामुळे चेन्नईला मोठा स्कोअर उभारता आला नाही आणि त्याचा फटका त्यांना सामन्यात पराभवाच्या रूपाने बसला.

### चेन्नईने केल्या १२७ धावा

या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या चेन्नई सुपर किंग्ज संघाला हवी तशी सुरुवात करता आली नाही. संजू सॅमसन आणि ऋतुराज गायकवाडने डावाची सुरुवात केली. राजस्थान रॉयल्सकडून नांद्रे बर्गरने आधी संजू सॅमसनला ६ धावांवर बाद केलं. तर ऋतुराज गायकवाड देखील अवघ्या ६ धावा करून माघारी परतला.




# जडेजा भावुक; 'जड्डू-जड्डू'च्या घोषणांनी मैदान भारावलं

**महाईन्यूज । गुवाहाटी**

**आयपीएल २०२६ हंगामात राजस्थान रॉयल्स संघाने चेन्नई सुपर किंग्ज वर विजय मिळवत दमदार सुरुवात केली. मात्र या सामन्यात सर्वाधिक चर्चेत राहिला तो रवींद्र जडेजा. ट्रेडनंतर पहिल्यांदाच चेन्नईविरुद्ध खेळताना जडेजावर चाहत्यांनी केलेल्या प्रेमाचा वर्षाव पाहून तो भावुक झाल्याचं दृश्य पाहायला मिळालं.**





सामन्यात जडेजाने आपल्या गोलंदाजीने प्रभाव टाकत एका षटकात दोन महत्त्वाच्या विकेट घेतल्या. सर्फराज खान आणि शिवम दुबे यांना बाद करत त्याने चेन्नईला मोठे धक्के दिले. विकेट घेतल्यानंतर केलेल्या त्याच्या खास सेलिब्रेशननेही सर्वांचं लक्ष वेधलं.

यानंतर सीमारेषेजवळ क्षेत्ररक्षण करत असताना चेन्नईच्या चाहत्यांनी 'जड्डू-जड्डू'च्या घोषणा देत जडेजाचं स्वागत केलं. जर्सी बदलली असली तरी चाहत्यांचं प्रेम कायम असल्याचं पाहून जडेजा भावुक झाला. त्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

जडेजा २०१२ पासून चेन्नईचा अविभाज्य भाग राहिला होता. एमएस धोनी नंतर सर्वाधिक प्रेम मिळवणाऱ्या खेळाडूंमध्ये त्याची गणना होते. २०२३ च्या अंतिम सामन्यातील त्याच्या निर्णायक खेळीमुळे चेन्नईला जेतेपद मिळालं होतं.

दरम्यान, आयपीएल २०२६ पूर्वी झालेल्या मोठ्या ट्रेडमध्ये जडेजा आणि संजू सॅमसन यांची अदलाबदल झाली. चेन्नईला भविष्यातील कर्णधार म्हणून सॅमसन मिळाला, तर राजस्थानने आपल्या संघात अनुभवी अष्टपैलू जडेजाला सामील करून घेत संघ अधिक मजबूत केला.

### ट्रेडची मोठी डील

आयपीएल २०२६ पूर्वी झालेल्या मोठ्या ट्रेडमध्ये रवींद्र जडेजा आणि संजू सॅमसन यांची अदलाबदल झाली. चेन्नईला भविष्यातील कर्णधार आणि यष्टीरक्षक-फलंदाज मिळाला, तर राजस्थानने अनुभवी अष्टपैलू खेळाडू जडेजाला संघात घेत आपली ताकद वाढवली. या निर्णयामुळे दोन्ही संघांमध्ये मोठे बदल पाहायला मिळाले.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।
दि. 01 एप्रिल 2026।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या कामाची स्व. राम सुतार यांच्या कार्यशाळेत केली पाहणी

# 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण' वर आरोप करणाऱ्यांना आण्णा बनसोडे यांचा आरसा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जगातील सर्वांत उंच पुतळा अर्थात "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" उभारण्याचे काम सुरू आहे. बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील ही शंभूसृष्टी शिव-शंभू प्रेमींच्या आस्थेचा आणि अस्मितेचा विषय ठरली आहे. मात्र, या शिव-शंभू कार्यात विघ्नसंतोषीपणा करण्याचा प्रयत्न अगदी विधानसभा निवडणुकीपासून सुरू आहे. पुतळ्याच्या कामाला खर्च जास्तीचा झाला म्हणून, महापालिका सर्वसाधारण सभेत गळा काढणाऱ्या मान्यवरांना आता थेट विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांनी अक्षरशः आरसा दाखवला आहे.**





भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक इंदू मिल, मुंबई येथे सुरू आहे. या ठिकाणी आंबेडकरांचा ब्राँझ धातुचा पुतळा उभारण्यात येत आहे. त्याचे काम जगप्रसिद्ध शिल्पकार स्व. राम सुतार यांच्या गाझीयाबाद येथील कार्यशाळेत सुरू आहे. सुतार यांच्यानंतर ही कार्यशाळा त्यांचा मुलगा शिल्पकार अनिल सुतार चालवतात. त्यांचेकडेच पुतळ्याचे काम सुरू आहे. या पुतळ्याची पाहणी राष्ट्रवादीचे नेते आणि विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांनी केली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.

आण्णा बनसोडे म्हणाले की, पुतळ्याचे काम ३५-४० टक्के पूर्ण झाले आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा हा पुतळा आहे. काम सुरू झाले त्यावेळी ब्राँझची किंमत ८५० रुपये इतकी होती. त्यामध्ये वाढ होवून ती १७०० रुपयांपर्यंत गेली आहे. कारागिरांचे पगार वाढले आहेत. कामासाठी लागणारा कच्चा माल आणि पुरवठा यावर अमेरिका-इस्त्राईल- इराण युद्धाचाही परिणाम झाला आहे. त्यामुळे दरांमध्ये तफावत झाली असून, टेंडर कॉस्टपेक्षा जास्तीचा खर्च होणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना पाठपुरावा करुन निधी उभा केला जाईल. याद्वारे दरांमधील तफावत आणि वाढीव खर्चाच्या मुद्याला बनसोडे यांनी तांत्रिकदृष्टया समर्पक उत्तर दिले. ते पिंपरी-चिंचवडमधील 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण'ला सुद्धा लागू होते.

किंबहुना, 'स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण' चे कामसुद्धा स्व. राम सुतार यांच्या कार्यशाळेत पूर्ण करण्यात आले. पुतळ्याचे पार्ट मोशीत आणण्यात आले. त्याची जोडणी आणि फ्रॅब्रिकेशनचे काम पूर्ण करण्यापूर्वीच त्याच्या गुणवत्तेवर विधानसभा निवडणूक काळात प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले. केवळ राजकीय उद्देशाने महापालिका निवडणुकीतसुद्धा तसा प्रयत्न झाला. त्याची री-पुन्हा महापालिका सभेतही ओढण्यात आली. या सर्व प्रकारात राष्ट्रवादीचे नगरसेवक संदीप वाघेरे, शिवसेनेच्या नगरसेविका सुलभा उबाळे आघाडीवर होत्या. पुतळ्याच्या कामासाठी ५० कोटी रुपयांची स्थापत्य आणि विद्युत विषयक कामांसाठी "अॅट पार" म्हणजे टेंडर कॉस्ट एवढ्या रकमेची निविदा मंजूर करण्यावरुन स्थायी समिती आणि मुख्य सभेत अनेक आक्षेप नोंदवण्यात आले. पण, इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे काम आणि मोशीतील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याचे काम एकाच कार्यशाळेत झालेले आहे. त्यांच्या नियंत्रणात काम सुरू आहे. मग, महाराजांच्या पुतळ्यावर होणाऱ्या खर्चावर आक्षेप घेतला जातो. त्यामागे राजकीय हेतू साध्य करण्याचा प्रयत्न आहे, हे स्पष्ट होते.

### पिंपरी-चिंचवडकरांची अपेक्षा

महामानवांची पुतळे आणि स्मारके यामध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण होवू नये. स्मारकाचे काम गुणात्मक दर्जाचा विचार करुन झाले पाहिजे. १०० वर्षांपेक्षा जास्तकाळ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" टिकला पाहिजे. त्या अनुशंगाने पुतळ्याचे काम व्हावे. पिंपरी-चिंचवड शहराला जगात कोण ओळखतं? असा प्रश्न विचारल्यामुळे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यावर टीकेची झोड उठली. मग, शहराची ओळख जगभरात व्हावी, असे प्रकल्प, स्मारक होत आहेत. त्याबद्दल निराधार टीका-टीपण्णी करुन राजकीय स्वार्थ साधणाऱ्यांना जाब कोण विचारणार? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे शहराची ओळख असलेल्या कामांवर बोलताना मान्यवर लोकप्रतिनिधींनी भान ठेवावे, अशी माफक अपेक्षा सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांकडून व्यक्त होत आहे.

# दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्प आदर्शवत; आंतरराष्ट्रीय झिरो वेस्ट दिन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने दापोडी येथील आनंदवन झिरो वेस्ट प्रकल्पात आंतरराष्ट्रीय शून्य कचरा दिन उत्साहपूर्ण व नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, तसेच सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरलेल्या पथनाट्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शून्य कचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे चार प्रकारे विलगीकरण, सिंगल यूज प्लास्टिकवरील बंदी, कापडी पिशव्यांचा वापर, 'आर.आर.आर. सेंटर'ची संकल्पना तसेच घरगुती कंपोस्टिंग यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर नाट्यमय व प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

तसेच उपस्थितांना दापोडी येथील शून्य कचरा प्रकल्पाची सविस्तर माहिती देत कचरा व्यवस्थापनातील आधुनिक उपाययोजनांची ओळख करून देण्यात आली. या कार्यक्रमास सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक उद्धव डवरी, दीपक कोटीयाना, आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे, नितीन तुपे, सचिन जाधव, ओंकार शिवणकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शहरात मोकाट जनावरांचा वाढता धोका

## विधी समिती सभापती सुजाता बोराटे यांची कठोर नियमांची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील मोकाट जनावरे, मोकाट कुत्रे आणि पाळीव प्राण्यांबाबत कठोर नियमावली लागू करण्याची मागणी विधी समिती सभापती सुजाता बोराटे यांनी महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन देत केली आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.**



> पिंपरी-चिंचवड शहरात मोकाट कुत्रे व जनावरांची समस्या अत्यंत गंभीर बनली असून, नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कठोर नियमावली लागू करून निर्बिजीकरण, लसीकरण आणि नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही.आमदार महेशदादा लांडगे यांनी याबाबत विधानसभा सभागृहातही आवाज उठवला होता. त्यांच्याच मार्गदर्शनात आम्ही याबाबत पाठपुरावा करू, या गंभीर विषयावर तातडीने लक्ष देऊन महापालिकेने ठोस निर्णय घ्यावेत.
>
> – **सुजाता बोराटे, सभापती, विधी समिती, पिं. चिं. मनपा.**

पिंपरी-चिंचवड शहरात दिवसेंदिवस मोकाट कुत्रे आणि जनावरांची समस्या गंभीर बनत चालली असून, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नुकत्याच चाकण परिसरात घडलेल्या एका धक्कादायक घटनेत मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाल्याने शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर विधी समितीच्या अध्यक्षा सुजाता बोराटे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन सादर करत तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरात कुत्र्यांच्या हल्ल्यांमुळे जखमी झालेल्या नागरिकांची संख्या तब्बल ४० हजारांच्या घरात पोहोचली असून, ही बाब अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी नमूद केले. बोराटे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की, केवळ मोकाट प्राण्यांमुळेच नव्हे तर काही नागरिकांकडून पाळीव प्राण्यांची योग्य देखभाल केली जात नाही. अनेक वेळा पाळीव कुत्र्यांना मोकाट सोडले जाते किंवा सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचे नियम पाळले जात नाहीत, यामुळेही नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

## दिव्यांगांना सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी महापालिका कटिबद्ध

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

शहरातील दिव्यांग बंधू-भगिनींना सक्षम करुन त्यांचे जीवन सुलभ व स्वावलंबी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कटिबद्ध व तत्पर आहे. दिव्यांग नागरिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे." असे उद्गार महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणीमाई पठारे यांनी काढले.

महापालिकेच्या 'दिव्यांग भवन फाउंडेशन' ला पठारे यांनी शुक्रवारी (ता. २७) सदिच्छा भेट दिली. तेव्हा त्यांनी फाउंडेशनच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी माजी नगरसेविका श्रद्धा लांडगे, महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्या, दिव्यांग भवनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी, पूजा भापकर व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सभापती राणीमाई पठारे आणि श्रद्धा लांडगे यांनी दिव्यांग बांधवांसाठी उपलब्ध असलेल्या विविध आरोग्य सेवा, उपचार पद्धती, पुनर्वसन सुविधा आणि प्रशिक्षण उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. संस्थेमार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पांची माहिती घेतली. या सेवा अधिक प्रभावी आणि दर्जेदार कशा करता येतील याविषयी चर्चा केली.

दिव्यांग बांधवांना मिळणाऱ्या सुविधांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सेवा विस्तारावर अधिक भर द्यावा आणि तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पठारे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने दिव्यांग नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा आणि आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिका सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असे पठारे यांनी सांगितले.





## पिंपरीत बनावट 'पुमा' ब्रँडची विक्री

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी परिसरात बनावट ब्रँडेड कपड्यांची विक्री करून ग्राहकांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'पुमा' कंपनीचा बनावट लोगो वापरून लाखोंचा माल विक्रीसाठी साठवून ठेवणाऱ्या आरोपीवर पिंपरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३० मार्च २०२६ रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास साई चौक, शनी मंदिराजवळील लेजंड चॉईस परिसरात ही कारवाई करण्यात आली. येथे छापा टाकून पोलिसांनी सुमारे ८६ हजार १८४ रुपयांचा बनावट कपड्यांचा साठा जप्त केला. यामध्ये टी-शर्ट, हाफ पॅन्ट आणि ट्रॅक पॅन्टचा समावेश आहे. या प्रकरणी इस्माईल इस्तीखर खान (वय ३१, रा. विजयनगर, काळेवाडी, पिंपरी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी हा बनावट 'पुमा' लोगो लावून कपडे विक्रीसाठी ठेवत होता. या माध्यमातून ग्राहकांची तसेच कंपनीची आर्थिक फसवणूक करण्याचा त्याचा उद्देश असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

या घटनेप्रकरणी नीरजकुमार नरेंद्रकुमार दहिया (वय ३८, रा. गाझियाबाद, उत्तरप्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आरोपीला नोटीस बजावून पुढील कारवाई सुरू केली आहे.

या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. १६६/२०२६ नोंद करण्यात आला असून, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३४७, ३४९ तसेच कॉपीराइट कायद्यांतर्गत कलम ५१, ६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस निरीक्षकांकडून पुढील तपास सुरू असून, शहरात बनावट ब्रँडच्या मालाविरोधात कारवाई अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

# भाजपा मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचा मिळकत कर भरणा निर्धारीत वेळेतच!

## कर संकलन विभागाकडून माहिती मिळताच भरणा; - भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांची माहिती

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन प्रक्रियेतील त्रुटींमुळे भाजपा मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयाचा मिळकतकर वेळेत भरला गेला नसल्याची बाब समोर आली होती. मात्र प्रशासनाकडून सूचना मिळताच संबंधित कराची रक्कम निर्धारित वेळेत भरण्यात आल्याची माहिती भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी दिली आहे.**



> नियम सर्वांसाठी समान आहेत. कोणतीही तांत्रिक अडचण असली तरी जबाबदारी टाळली जाणार नाही. आम्ही निर्धारित वेळेत कर भरून पारदर्शकता आणि आमचे उत्तरदायित्व जपले आहे. राजकीय उद्देशाने टीपण्णी करणाऱ्यांनी निश्चिंत राहावे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही आपल्या कर्तव्याप्रती कटिबद्ध आहोत.
>
> **– शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

महानगरपालिकेकडून मिळकतकर वसुलीसाठी खासगी संस्थांच्या माध्यमातून पावत्या वितरित केल्या जातात. याच प्रक्रियेत संबंधित कार्यालयाला कर पावती वेळेत प्राप्त झाली नव्हती. त्यामुळे कर भरण्यात विलंब झाला. ३१ मार्च हा कर भरण्याचा अंतिम दिवस असल्याने प्रशासनाने ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर तातडीने कारवाई करत संपूर्ण थकबाकी भरल्याचे काटे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, महापालिकेकडून सर्वसामान्य नागरिकांकडून कर वसुलीसाठी कडक भूमिका घेतली जाते. थकबाकीदारांवर मालमत्ता जप्त करणे, पाणीपुरवठा बंद करणे अशा कठोर उपाययोजना केल्या जातात. अशा परिस्थितीत सत्ताधारी पक्षाच्या कार्यालयावरच पाच वर्षांचा कर थकीत असल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आल्यानंतर चर्चा रंगली होती.

या पार्श्वभूमीवर शत्रुघ्न काटे यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थिती स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, "भारतीय जनता पक्ष सत्तेत असला तरी कर भरण्यापासून कोणतीही सूट मिळत नाही. आम्ही नियमांनुसार कराची रक्कम भरली आहे." अभय योजनेची मुदत ३१ मार्च पर्यंत होती. त्या मुदतीमध्ये कर भरणा जमा करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, या प्रकरणावरून होत असलेल्या राजकीय टिपण्णीबाबत काटे यांनी नाराजी व्यक्त केली. अपूर्ण माहितीच्या आधारे किंवा राजकीय हेतूने चुकीच्या चर्चा करणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात अशा प्रकारच्या तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी संबंधित विभागाशी समन्वय ठेवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे महापालिकेच्या कर संकलन प्रक्रियेतील त्रुटी अधोरेखित झाल्या असून, पावती वितरण यंत्रणा अधिक कार्यक्षम करणे आणि समन्वय अचूक करण्याची गरज आहे, असे स्पष्ट होत आहे.



# VerSe Innovation तर्फे पी. आर. रमेश यांची स्वतंत्र संचालक आणि ऑडिट कमिटीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**VERSE INNOVATION, जी भारतातील आघाडीची AI-आधारित स्थानिक भाषा तंत्रज्ञान कंपनी आणि डेलीहंट (DAILYHUNT), जोश (JOSH), मॅगझ्टर (MAGZTER) व नेक्सव्हर्स.एआय यांची मूळ संस्था आहे, त्यांनी आज श्री. पी. आर. रमेश यांची त्यांच्या बोर्डावर स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्ती केल्याची घोषणा केली. ते ऑडिट कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही काम पाहतील. कंपनी आपल्या संस्थात्मक आणि धोरणात्मक वाढीच्या पुढील टप्प्याकडे वाटचाल करत असताना, ही नियुक्ती कंपनीची प्रशासकीय रचना (GOVERNANCE ARCHITECTURE) अधिक मजबूत करेल.**



श्री.रमेश हे एक सनदी लेखापाल (Chartered Accountant) असून त्यांना आर्थिक देखरेख, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, नियामक सल्लागार आणि बोर्ड नेतृत्वाचा ४० वर्षांहून अधिक काळचा अनुभव आहे. ते डेलॉईट इंडियाचे (Deloitte India) माजी अध्यक्ष आणि डेलॉईट ग्लोबल बोर्डाचे माजी सदस्य आहेत. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक आघाडीच्या भारतीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना प्रशासन, जोखीम व्यवस्थापन, आर्थिक अहवाल मानके आणि नियामक अनुपालनाबाबत मार्गदर्शन केले आहे.

सध्या ते एअर इंडिया, सिप्ला, नेस्ले इंडिया, लार्सन अँड टुब्रो, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, आयटीसी हॉटेल्स, सायँट, तेजस नेटवर्क्स आणि हाऊसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन (HDFC) यांसारख्या अनेक नामांकित सूचीबद्ध आणि असूचीबद्ध कंपन्यांच्या बोर्डावर कार्यरत आहेत किंवा त्यांनी काम केले आहे. त्यांना एशियन सेंटर फॉर कॉर्पोरेट गव्हर्नन्स अँड सस्टेनेबिलिटीतर्फे २०२२-२३ वर्षासाठी "सर्वोत्कृष्ट स्वतंत्र संचालक" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

व्यावसायिक सेवांमधील नेतृत्वाव्यतिरिक्त, श्री. रमेश यांनी भारतातील नियामक आणि धोरणात्मक संवादाला आकार देण्यात सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांनी SEBI, RBI आणि IRDA शी संबंधित महत्त्वाच्या समित्या आणि सल्लागार संस्थांवर काम केले असून, विविध क्षेत्रांतील प्रशासन आणि आर्थिक मानकांच्या उत्क्रांतीमध्ये योगदान दिले आहे.

VerSe Innovation चे सह-संस्थापक उमंग बेदी म्हणाले: "भक्कम प्रशासन आणि आर्थिक शिस्त ही दीर्घकाळ टिकणारी कंपनी उभारण्यासाठी मूलभूत आहे. पी.आर. रमेश यांच्याकडे बोर्ड स्टीवर्डशिप, नियामक आराखडे आणि जागतिक ऑडिट नेतृत्वाचा अतुलनीय अनुभव आहे. जशी VerSe Innovation प्रगल्भ होत आहे आणि शाश्वत वाढीवर लक्ष केंद्रित करत आहे, तसाच त्यांचा दृष्टिकोन आमची प्रशासकीय मानके मजबूत करण्यासाठी आणि भागधारकांचा विश्वास वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल."VerSe Innovation, जे 'भारत' वर लक्ष केंद्रित करणाऱ्या आपल्या अ‍ॅप्ससह स्थानिक भाषांमधील तंत्रज्ञानातील पहिले युनिकॉर्न (Unicorn) बनले आहे, त्यांच्या गुंतवणूकदारांमध्ये Goldman Sachs, Gladebrooks, Falcon Edge Capital, AlphaWave, Sequoia Capital India, Matrix Partners India, Google, Microsoft, Lupa Systems, Luxor Group, Sofina, B Capital Group, IIFL, Kotak, Catamaran, Bay Capital, Edelweiss आणि Omidyar Network यांचा समावेश आहे.

## VerSe Innovation प्रायव्हेट लिमिटेडबद्दल

तंत्रज्ञानाच्या मदतीने डिजिटल दरी कमी करता येते, या संकल्पनेवर VerSe Innovation ची पायाभरणी झाली आहे. स्थापनेपासूनच, तंत्रज्ञानाचा वापर करून लाखो ग्राहकांच्या कंटेंटच्या गरजा पूर्ण करण्याचे आव्हान VerSe Innovation ने स्वीकारले आहे. तिचे अद्वितीय कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग आणि डीप लर्निंग तंत्रज्ञान लाखो वापरकर्त्यांना त्यांच्या आवडीनुसार वैयक्तिकृत कंटेंट पोहोचवण्यास सक्षम करते. आज VerSe Innovation चे मालकीचे तंत्रज्ञान व्यासपीठ भारतातील लाखो वापरकर्त्यांना 'Dailyhunt' वर त्यांच्या स्थानिक भाषेत कंटेंटचा आनंद घेण्यास मदत करते. हे तंत्रज्ञान भारताचे #१ आणि सर्वाधिक पसंतीचे क्रिएटर अ‍ॅप 'Josh' ला देखील चालवते. याव्यतिरिक्त, VerSe Innovation कडे NexVerse.ai, Dailyhunt Premium, Josh's Audio Calling & Audio Stories आणि VerSe Collab यांसारख्या AI-फर्स्ट उत्पादनांचा पोर्टफोलिओ आहे, जे भारतीय डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्राहक, कंटेंट आणि ब्रँड्समधील परस्परसंवाद बदलत आहेत.

